# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.
desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे / कालमर्यादित**
30.1.2015

क्रमांक: 2अ/एडीएम/2014/ ९५७
दिनांक: 27 JAN 2015

प्रति,
सर्व सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर

विषय : शासनामार्फत होणारी सर्व प्रकारची प्रदाने ईसीएस/ एनईएफटी मार्फत करण्यासाठी आवश्यक माहिती सादर करण्याबाबत...

संदर्भ : शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकीर्ण १०१०/ प्र क्र ६८/ कोषा प्र-५, दिनांक १८.४.२०११

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शासनामार्फत होणारी सर्व प्रदाने ईसीएस/ एनईएफटी ची सुविधा वापरून करण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केलेले आहेत. ई सी एस / एन ई एफ टी द्वारे प्रदान करण्यसाठीचा तपशिलाचे विवरणपत्र शासनाने निर्धारीत केले आहे. त्या प्रपत्रामध्ये आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक पदवी , पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना माहिती भरण्याबाबत कळविण्यात यावे. आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांची याबाबतची माहिती एकत्रित संकलित करून ती **संचालनालयास दिनांक ३०.१.२०१५ पर्यंत** जमा करण्यात यावी. आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्थांची माहिती संकलित झाली आहे याची खातरजमा करूनच ही माहिती आपल्या कार्यालयामार्फत संचालनालयास जमा करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत संस्थांना संचालनालयास थेट माहिती सादर करण्यास कळविण्यात येऊ नये.

संचालनालयाकडून संस्थांना अदा करावयाच्या रकमांसाठी सदर माहिती आवश्यक असल्यामुळे या प्रकरणी त्वरीत माहिती घेण्यात यावी व तशा सूचना सर्व संस्थांना त्वरीत निर्गमित करून माहिती संकलित करून संचालनालयास सादर करण्यात यावी. माहिती देण्यासाठीचे प्रपत्र "जोडपत्र-अ" सोबत जोडले आहे.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

क्रमांक:-विकाअ/शिक्षण/ECS/२०१५/ २४६
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक ११/२/२०१५

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-१) प्राचार्य, सर्व व्यवसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था यांना कळविण्यात येते की, वरील पत्रात दिलेल्या निर्देशाप्रमाणे सोबतच्या जोडपत्रात दिनांक १३/०२/२०१५ पर्यंत माहिती न चूकता सादर करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०१०/ प्र क्र ६८/ कोषा प्र-५, दिनांक १८ एप्रिल,२०११ चे सहपत्र

**जोडपत्र-अ**

ईसीएस/ एनईएफटी/द्वारे प्रदाने प्राप्त करण्यासाठीचा तपशिल

१. संस्थेचे नाव व डीटीई कोड

२. कार्यालयाचे नाव व पत्ता

३. बँक खाते क्रमांक

४. बँक खात्याचा प्रकार

५. बँकेचे नाव

६. बँक शाखेचे नाव व पत्ता

७. बँक शाखेचा संकेतांक

८. एमआयसीआर क्रमांक

९. आयएफएससी संकेतांक

दिनांक :

**संस्थाप्रमुखांची सही**

**बँकेचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी तपासून पाहिली असून ती योग्य आहे .

**बँक शाखा प्रमुख**

**......... (बँक शाखेचे नाव व शिक्का )**

D:\Budage\2015-16\General Correspondence\IFSC code of institutes.docx